**पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर**
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

महाराष्ट्र पोलीस

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ २२ /२०२३ दि.११/०२/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**संदर्भ :– वागळे वाहतूक उप विभाग कार्यालयाचे जा.क्र. ११६/२०२३, दि. १०/०२/२०२३.**

*****

**ज्याअर्थी,** वागळे वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. १२/०२/२०२३ रोजी लक्ष्मी पार्क फेज १ समोर, पोखरण रोड नं. १, ठाणे पश्चिम येथे **मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत** राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नगरसेवक श्री. हणमंत ज्ञानु जगदाळे व इतर नगरसेवक, प्रमुख सहकारी, पदाधिकारी व कार्यकर्ते असे **'बाळासाहेबांची शिवसेना शिंदे गट'** या पक्षात प्रवेश करणार आहेत. सदर वेळी पु. ल. देशपांडे मार्ग लक्ष्मी फेज १ समोर स्टेज बांधण्यात येणार असून तेथे मोठया प्रमाणात कार्यकर्ते जमणार आहेत. त्याकरीता सदर मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद** – शास्त्रीनगर कडून रूणवाल प्लाझा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना लक्ष्मी पार्क फेज १ समोर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने लक्ष्मी पार्क फेज १ समोरील चौकातून उजवीकडे वळण घेवून अथवा यु टर्न घेवून परत शास्त्रीनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** – रूणवाल प्लाझा कडून शास्त्रीनगर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना शंकर मंदिर, पाडा नं. २ येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने कै. निर्मलादेवी दिघे हॉस्पिटल (कोरस हॉस्पिटल) कडून उजवीकडे वळण घेवून वर्तकनगर नाका मार्गे अथवा डावीकडे वळण घेवून लोकमान्यनगर पाडा नं. २, ३, ४ मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसुचना दि. ११/०२/२०२३ रोजी रात्रौ २१:०० वा. ते दि. १२/०२/२०२३ रोजी रात्रौ २३:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, रूग्णवाहिका, फायर ब्रिगेड व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

CamScanner

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ५, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी** :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई/बृन्मुंबई महानगरपालिका.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे/वागळे व पो.निरी. नौपाडा, कोपरी, वागळे, कापूरबावडी वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner